# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

PDCC BANK

मुख्य कचेरी : ४ ब, बी.जे. रोड, पुणे - ४११००१.

✻ पो. बॉक्स नं.१०९ ✻ दुरध्वनी क्र.: २६१३३८३३, २६१३९३००. ई-मेल: ho@pdccbank.com


## ✻ लेखनिक पदाच्या ऑनलाईन भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना ✻

१. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दि. ०७.०८.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून ज्या पात्र उमेदवारांनी दि. ०७.०८.२०२१ ते दि. १७.०८.२०२१ या कालावधीत ऑनलाईन संकेतस्थळावर (https://pdccbank.co.in/careers/) व (https://punedccbank.in) नोंदणी करून परीक्षा शुल्क जमा केलेले आहे अशा उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात आलेले आहे.

२. ऑनलाईन परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची यादी बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच सदर उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये रजिस्टर केलेल्या ई–मेल आय.डी. वर पुढील प्रक्रियेची लिंक सोमवार, दि. १९.०५.२०२५ रोजी पाठविण्यात येईल.

३. एकाच उमेदवारानी एकापेक्षा अधिक अर्ज दाखल केलेले असल्यास सदर उमेदवाराचा एकच अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.

४. बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेच्या यादीमध्ये पात्र उमेदवारांचे नाव नसल्यास त्या पात्र उमेदवारांनी support@pdccbank.com या ई–मेल आय.डी.वर दि. १९.०५.२०२५ ते दि. ०५.०६.२०२५ या कालावधीत आक्षेप नोंदविणे आवश्यक आहे. सदर ई–मेल सोबत रजिस्टर क्रमांक (युजर आय.डी.),परिक्षा शुल्क जमा केल्याचे चलन व आधारकार्ड अपलोड करावे.

५. सदर भरतीच्या अनुषंगाने बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या सुचनांचे अवलोकन व पालन करून उमेदवारांनी पुढील सर्व प्रक्रिया पुर्ण करून घ्यावी.

६. सदर परिक्षेसाठी उमेदवारांना पुन्हा परीक्षा शुल्क भरावे लागणार नाही. सदर परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही किंवा इतर कोणत्याही परीक्षा किंवा निवडीसाठी राखीव ठेवता येणार नाही.

७. उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही, ऑनलाईन अर्जात नमूद केलेली माहिती गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या फक्त गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. मुलाखतीपुर्वी कागदपत्राच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यात येईल. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

८. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दि. ०७.०८.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. ३० जून २०२१ रोजीची निश्चीत वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता निवड प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे.

**९. ज्या उमेदवारांचा ई–मेल आय.डी./मोबाईल क्रमांक बदलला आहे अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन ई–मेल आय.डी./मोबाईल क्रमांक अद्ययावत करावयाचा आहे. याबाबत संकेतस्थळावरील सुचनांचे अवलोकन करून पालन करण्यात यावे.**

..२

१०. उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र, मुलाखत पत्र इ. डाऊनलोड करण्यास अडचण निर्माण झाल्यास ७०६६९५१९५१ हेल्पलाईनवर संपर्क साधता येईल. सदर हेल्पलाईन सकाळी १०.३० वा. ते सायं. ५.३० वा. पर्यंत उपलब्ध असेल. (सार्वजनिक व साप्ताहिक सुट्या वगळून)

११. उमेदवारांना येणाऱ्या अडचणीच्या निराकरणासाठी बँकेने दि.०७.०८.२०२१ रोजीच्या जाहिरातीत नमुद केलेला ई–मेल आय.डी. व हेल्पलाईन क्रमांक बंद झालेले आहेत. त्यामुळे सदर ई–मेल आय. डी. वरती दाखल होणाऱ्या तक्रारी ग्राह्य होणार नाही, याबाबतची जबाबदारी संस्था/बँकेची राहणार नाही.

१२. ऑनलाईन परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम बँकेच्या दि. ०७.०८.२०२१ रोजीच्या जाहिरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेला असून सदर जाहिरात बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द आहे.

१३. ऑनलाईन परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र (https://pdccb.recruitlive.in) ह्या संकेतस्थळावर प्रत्येक उमेदवाराच्या लॉगिनमध्ये उपलब्ध असेल याबाबतची माहिती उमेदवारांच्या नोंदणीकृत ई–मेल/मोबाईलवर एस.एम.एस.द्वारे पाठवण्यात येईल. (ई–मेल आय.डी. च्या संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना बँक/संस्था जबाबदार राहणार नाही) प्रवेशपत्र फक्त ऑनलाईन पध्दतीनेच डाऊनलोड करता येईल. तसेच बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल.

१४. उमेदवारांनी परीक्षेपूर्वी प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्यावे. सदर प्रवेशपत्रासह निर्धारीत वेळेत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. सोबत अधिकृत ओळखपत्र (आधार कार्ड, ड्रायविंग लायसन्स) असणे आवश्यक आहे. परीक्षेवेळी उमेदवाराकडे प्रवेशपत्र/ओळखपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षा देता येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

१५. ऑनलाईन परिक्षेच्यावेळी उमेदवारांचे बायोमेट्रिक उपस्थिती नोंद करण्यात येणार असल्याने त्यासाठी लागणारा वेळ विचारात घेवून उमेदवारांनी प्रवेशपत्रामध्ये नमुद केलेल्या निर्धारित वेळेपुर्वी परिक्षा केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

१६. ऑनलाईन परिक्षा एका पेक्षा अधिक सत्रामध्ये घेण्यात येणार असल्याने सामान्यीकरण (Equi-percentile Method of Normalization) पद्धतीचा अवलंब करुन उमेदवारांच्या ऑनलाईन परिक्षेतील प्राप्त गुणांचे सामान्यीकरण करण्यात येईल. त्यानुसार अंतिम गुण (Cut off Mark) निश्चित करण्यात येतील.

१७. ऑनलाईन परीक्षेचा निकाल बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबतचा संदेश उमेदवारांच्या नोंदणीकृत ई–मेल व मोबाईलवर पाठवण्यात येईल.

१८. ऑनलाईन परीक्षेच्या निकालानुसार पात्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणी व मुलाखतीसाठी बोलवण्यात येईल.

१९. मुलाखतीसाठीचे मुलाखत पत्र (https://pdccb.recruitlive.in) ह्या संकेतस्थळावर प्रत्येक उमेदवाराच्या लॉगिनमध्ये उपलब्ध असेल. याबाबतचा संदेश उमेदवारांच्या नोंदणीकृत ई–मेल व मोबाईलवर पाठवण्यात येईल. उमेदवारांनी मुलाखतीपुर्वी मुलाखत पत्र डाऊनलोड करून घ्यावे. सदर मुलाखत पत्रासह निर्धारीत वेळेत मुलाखत केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. सोबत अधिकृत ओळखपत्र आधार कार्ड/ड्रायविंग लायसन्स व पात्रतेबाबतची मूळ कागदपत्रे सोबत असणे आवश्यक आहे. मुलाखतीवेळी मुलाखत पत्र व ओळखत्र नसल्यास उमेदवाराची मुलाखत घेण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

२०. मुलाखतीनंतर अंतिम निकालानुसार बँकेच्या संकेतस्थळवर निवड झालेल्या उमेदवाराची यादी उपलब्ध असेल.

..३

२१. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दि. ०७.०८.२०२१ रोजीच्या जाहिरातीतील नमूद सुचनांचे अवलोकन करून पालन करणे उमेदवारांवर बंधनकारक आहे.

२२. ऑनलाईन परिक्षेचा कार्यक्रम व प्रवेशपत्र डाऊनलोड करणेबाबतची सुचना उपरोक्त संकेतस्थळावर अलहिदा प्रसिध्द करण्यात येईल.

२३. वरील सर्व माहितीच्या अपडेटसाठी उमेदवारांनी वेळोवेळी बँकेच्या संकेतस्थळाला भेट देणे आवश्यक आहे.

(स्वाक्षरी)
मुख्य कार्यकारी अधिकारी